खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## प्रथम वर्ष वाणिज्य

## सत्र २

### विषय

### व्यावसायिक नितीमुल्ये-II

### प्रकरण 1

## व्यवसायिक नीतिमूल्ये

# प्रकरण–1

# व्यवसायिक नीतिमूल्ये

**अर्थ**

नीती म्हणजे योग्य की अयोग्य असा अर्थ आहे. एखादी गोष्ट योग्य की अयोग्य ठरविणे व त्याचे नियम किंवा तत्त्व विचारात घेणे म्हणजे नीतिमत्ता होय. नितीमुल्य ही आधुनिक संकल्पना नसून मानवी सभ्यतेच्या विकास प्रक्रियेत नैतिक आचारसंहिता तयार झाली आहे. मानवी वर्तनाचा दिशा देण्यासाठी नीतिमूल्यांचा उदय घडून आला. नितीमुल्ये यास इंग्रजीत इथिक्स म्हटले जाते. हा शब्द एथॉस ग्रीक शब्दावरून तयार झालेला आहे. एथॉस या शब्दाचाअर्थ जगण्याचा मार्ग असा होतो. म्हणून नीतिमूल्य ही तत्त्वज्ञानाची शाखा असून तिचा मानवी चरणाशी संबंध आहे. मानवाने समाजात जगताना आचरणात आणावयाच्या नियमांचा समावेश नितीमुल्य या संकल्पनेत होतो. व्यवसायिक नीतिमूल्य म्हणजे अशी तत्वे पद्धती आणि तत्वज्ञान की जे व्यवसायिक लोकांना दैनंदिन व्यवहारात व्यावसायिक निर्णय घेताना मार्गदर्शन करतात. व्यवसायात नीतिमत्तेचे किंवा नैतिक मूल्यांचे होणारे आचरण म्हणजे व्यवसायिक नितीमुल्य होय.

**व्याख्या**

1. **पीटर ड्रकर-**नैतिकता म्हणजे दैनंदिन व्यवहारातील सरळ साधी आणि योग्य वर्तणूक किंवा सचोटी होय
2. **मेमोरिया-**वर्तणुकीतील प्रामाणिकता म्हणजे नैतिकता किंवा नितीमूल्य होय.

**व्यवसायिक नीतिमूल्यांची व्याप्ती**

**1. समाज-**

समाजाच्या गरजा भागवण्याच्या उद्देशाने व्यवसायिक संस्था निर्माण होतात. त्यामुळे समाजाच्या फायद्याच्या दृष्टीने व नैतिक दृष्टीने योग्य असे निर्णय घेणे आवश्यक असते. अशा प्रकारे विविध संस्थांच्या निर्णयांचा समाजावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो.

**2. हितसंबंधी-**

व्यवसायिक संस्थेच्या निर्णयांचा पुरवठादार ग्राहक व रोखे धारक अशा सर्वांवर परिणाम होतो. त्यामुळे कंपनीने आपल्या उत्पादकांना मधून काही विपरीत परिणाम होणार असतील तर ते स्पष्टपणे कळवावेत. उत्तमोत्तम सुविधा कंपनीकडून मिळाव्यात अशी ग्राहकांची भावना असते त्यामुळेच व्यवसायाला जोर चढतो.

**3. अंतर्गत पातळी-**

कर्मचारी व व्यवसायिक संस्था यांचा अंतर्गत पातळीमध्ये समावेश होतो. कामाच्या ठिकाणचे वातावरण चांगले असेल तर कामगार अधिक उत्साहाने कार्य करतात. त्यामुळेच कामगारांसाठी विविध सेवा सुविधा उपलब्ध करून देणे हे संस्थांचे कर्तव्य ठरते. त्यामुळे नैतिक दृष्ट्या चांगल्या योजनांचा अंमल व्यवसाय संस्थेने करावा.

**4. व्यक्तिगत पातळी-**

व्यवसाय संस्थेमध्ये विविध मानवी घटक कार्यरत असतात त्यांचा एकमेकांशी सतत संबंध येत असतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध रहावेत यादृष्टीने व्यवसाय संस्थेने कार्य करावे. प्रत्येक कर्मचाऱ्याचे संस्था सहकारी व वरिष्ठ कनिष्ठ यांच्या प्रती असणारे कर्तव्य व्यक्तिगत पातळीमध्ये येतात.

**<u>व्यवसायिक नीतिमूल्यांची उद्दिष्टे</u>**

**1. ग्राहकांचा विश्वास मिळविणे-**

आपल्या उत्पादनाबद्दल ग्राहक समाधानी असेल या दृष्टीने व्यवस्था संस्थेने कार्यरत असावे. वस्तूचा दर्जा किंमत याबाबत ग्राहकाने आश्वस्त व्हावे यासाठी व्यवसाय संस्थेने व्यवसायिक नीतिमूल्यांची पालन करणे आवश्यक असते.

**2. सामाजिक जबाबदारीची जाण-**

प्रत्येक व्यवसायिक समाजाला विविध प्रकारच्या सेवा पुरवून आपले सेवाकार्य पूर्ण करत असतो. ही भावना प्रामाणिकपणे जोपासली तर आपोआपच व्यवसायिक निती मूल्यांचे पालन केले जाईल.

**3. ग्राहक हक्कांचे रक्षण-**

भारतीय राज्यघटनेने ग्राहकांना काही हक्क प्रदान केले आहेत. व्यवसायिक निती मूल्यांचे पालन केल्याने ग्राहकांचे कोणत्याही प्रकारचे हक्क डावलले जाणार नाहीत याची दक्षता व्यवस्था संस्थेने घेणे आवश्यक आहे.

**4. व्यवसायाचा नावलौकिक वाढवणे-**

स्वबळावर व स्व कष्टावर उभारलेल्या व्यवसायाची पत व प्रतिष्ठा वाढावी. यासाठी व्यवसायिक नीती मूल्यांचे पालन व्हायला हवे. उदाहरणार्थ अंबानी उद्योग समूहाची प्रतिष्ठा वाढण्याचे एक कारण त्यांनी नीतिमूल्यांची केलेले पालन हेच आहे.

**5. हितसंबंधांचे रक्षण करणे**

व्यवसाय मधील सर्व मानवी हितसंबंधांचे रक्षण करणे. हे उद्दिष्ट व्यवसायाचे एक नैतिक जबाबदारी म्हणून असते.

**6. व्यापारातील गैरप्रकारांना आळा**

अधिकाधिक नफा प्राप्तीच्या उद्देशाने व्यावसायिकांकडून अनेक अधिकाधिक नफा प्राप्तीच्या उद्देशाने व्यावसायिकांकडून अनेक गैरप्रकार केले जातात त्यांचे ग्राहकांवर परिणाम होतात. व्यवसायिक नितीमूल्यांचे पालन केल्याने साहजिकच अशा गैरप्रकारांना आळा बसतो.

**<u>नीतिमूल्यांची आवश्यकता</u>**

**1. नीतिमूल्य व व्यवसाय वृद्धि-**

अमेरिकेसारख्या औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशात नीतिमूल्यं वर आधारित अभ्यासक्रम व कार्यक्रमांचे संयोजन जगातील इतर देशांच्या तुलनेने मोठ्या प्रमाणावर केले जाते. व्यावसायिक नीतिमूल्ये अभ्यासक्रमांच्या योजनांसाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करण्यात येत आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशात विविध समस्यांमुळे व्यवसायिक निती मूल्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

**2. बाजारपेठेत प्रभावी कार्य –**

करण्यासाठी नीतिमूल्यं मुळे नीतिमूल्यं मुळे आधारित भांडवलशाही अर्थव्यवस्था समाजासाठी प्रचंड प्रमाणावर संपत्ती निर्माण करू शकते. सरकारी हस्तक्षेपाचा वापर करुन कार्यक्षमता कमी करून संपत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. किंमत व दर्जानुसार

बाजारपेठेत कार्यपद्धती ठरविण्याचा सरकारी नियंत्रणामुळे प्रतिबंध केला जातो. व्यवसायिक संबंध व ग्राहकांचे कल्याण यांच्याशी मूल्य निगडित असतात. त्यामुळे बाजारपेठेमध्ये प्रभावी कार्य करण्यासाठी नीतिमूल्यांची आवश्यकता आहे.

**3. समूह भावना निर्माण करण्यासाठी-**

जगातील बहुसंख्य धर्मांमध्ये हे व्यक्तिगत स्वार्थ बाबतच्या क्रियांबाबत उपदेश आणि सत्या चरणाचे विचार मांडले आहेत. कामगार म्हणजे नफा मिळविण्याच्या प्रक्रियेतील फक्त साधन नसून त्याला काही मूल्य आहेत. याचा विचार अमेरिका तसेच भारतातही करण्यात येतो समूह भावना निर्माण करण्यात नितीमुल्य महत्त्वाची भूमिका बजावतात.

**4. समाजाचे रक्षण करण्यासाठी-**

सरकारी नियम किंवा नियंत्रण आपेक्षा तंत्रज्ञान अधिक वेगाने उद्योग संस्थांमध्ये प्रवेश करीत असते. सरकार दूर अंतरावर असते. परंतु व्यवसायातील लोक तंत्रज्ञानाचे धोके समजू शकतात कायदेशीर मर्यादांचे पालन करून केलेल्या व्यवसायापासून समाजाला त्रास होऊ शकतो. त्यामुळे समाजाचे संरक्षण करण्यासाठी नीतिमूल्यांची आवश्यकता आहे.

**5. सांस्कृतिक मतभेद दूर करण्यासाठी-**

काही महत्वाच्या सांस्कृतिक मतभेदांमुळे विविध व्यक्तींच्या नीतिमूल्यं विषयीच्या दृष्टीकोनात फरक आढळतो. पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत जपानमध्ये व्यक्तिगत संबंधांवर अधिक भर दिलेला आढळतो. जगाच्या वित्तीय बाजारपेठेत जपान हा महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे सांस्कृतिक मतभेद दूर करण्यासाठी नीतिमूल्यांची आवश्यकता आहे.

**6. समाजात प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी-**

कंपनी ग्राहकांच्या पैशाचा योग्य मोबदला देते. तेव्हा विश्वासाचे वातावरण निर्माण होते कंपनीचे शेअर्स कर्जरोखे इत्यादी त्वरित विकले जातात. लोकशाही समाजात जन्मता ला फार महत्व असते. त्यामुळे समाजामध्ये प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी नीतिमूल्यांची आवश्यकता आहे.

**7. उत्कृष्ट निर्णय घेण्यासाठी-**

सामान्य जनता व कामगार किंवा ग्राहक यांच्या हिताचा विचार करून दीर्घकालीन निर्णय घेताना नितीमुल्ये महत्त्वाची ठरतात. आर्थिक व सामाजिक उद्दिष्ट यांचा योग्य मेळ घातला जातो. त्यामुळे उत्कृष्ट निर्णय घेण्यासाठी नीतिमूल्यांची आवश्यकता असते.

## व्यवसाय नीतिमूल्यंचे फायदे

### A) व्यवसायनीतिमूल्यंमुळेग्राहकालाहोणारेफायदे

१. व्यवसाय नीती मूल्यामुळे व्यावसायिक संघटना योग्य व्यापारी पद्धती स्वीकारतात त्यामुळे ग्राहकांना संरक्षण मिळते.

२. काळाबाजार दलालांकडून नफेखोरी आणि समाजास विघातक कृत्ये अशा वितरण पद्धतीमुळे गैरप्रकार यांचे निर्मूलन व्यवसाय नीतिमूल्यं मुळे होते.

३. व्यावसायिक संस्था उचित व्यापारी पद्धतींचा अवलंब करीत असतात सर्व नियमांचे काटेकोर पालन करतात त्यामुळे ग्राहकांच्या हक्कांचे रक्षण यासाठी वेगळी बाहेरची संस्था असण्याची गरज राहत नाही.

४. व्यावसायिक नीतिमत्ता यामुळे ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने व्यवसाय चालत असल्याकारणाने ग्राहकांना समाधान मिळते.

### B) व्यवसाय नीतिमूल्यं मुळे व्यवसायाला होणारे फायदे

१. व्यवसायिक नीतिमत्तेचे पालन केल्याने एखाद्या संस्थेला आपला व्यवसाय वाढविण्यास मदत होतो.

२. व्यवसाय नीती किमतीमुळे व्यावसायिक व ग्राहक यांच्यात विरगती व दृढ नाते संबंध निर्माण होतात.

३. व्यवसायामध्ये योग्य पद्धतीचा वापर किंवा अवलंब केल्याने ग्राहक आणि समाज यांच्या हिताची काळजी घेतली जाते

४. व्यवसायिक नैतिक त्यामुळे सामाजिक जबाबदारीची जाणीव व्यावसायिकांमध्ये निर्माण होते.

५. व्यवसाय निती मूल्यामुळे व्यवसायिक संस्थेला ग्राहकांमध्ये आदर निर्माण होऊन समाजात प्रतिष्ठा प्राप्त होत असते.

## व्यवसायिक नैतिकतेची तत्वे

**१. अखंडता**

जेव्हा जेव्हा जास्तीत जास्त नफा मिळवणे ऐवजी योग्य करण्याचा मोठा दबाव असतो. तेव्हा या तत्त्वाची चाचणी केली जाते अधिकाऱ्यांनी योग्य ते काय वाटते ते करून धैर्य व वैयक्तिक सचोटीचे प्रदर्शन करणे आवश्यक आहे.

**२. निष्ठा**

विश्वासात शिवाय कोणत्याही नैतिक वर्तनाची जाहिरात केली जाऊ शकत नाही आणि विश्वासाठी निष्ठा दर्शविणे आवश्यक आहे. संस्था व व्यक्तींशी निष्ठावान राहून विश्वासाची पात्रता असणे आवश्यक आहे. प्रतिकूल परिस्थितीत मैत्री आणि कर्तव्यनिष्ठा आणि भक्ती असणे आवश्यक आहे त्यामुळे व्यवसायांमध्ये निष्ठा असणे आवश्यक आहे.

**३. प्रामाणिकपणा**

व्यवसायातील कार्यकारी अधिकारी त्यांच्या नियमित कामाचे काम करताना प्रामाणिक असतात. त्यांना सत्यवादी देखील असले पाहिजे आणि इतरांना ती माहिती फसवून किंवा दिशाभूल करून देईल. अशा प्रकारची माहिती पसरवू नये त्यांनी प्रत्येक कामाशी प्रामाणिकतेचे तत्व अवलंबून कामे पार पाडली पाहिजेत.

**४. निष्पक्षता**

व्यवसायातील अधिकाऱ्यांनी सर्व व्यवहारांमध्ये निष्पक्ष असणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी त्यांच्या शक्तीचा चुकीचा वापर देखील करू नये. त्यांनी कोणताही फायदा घेण्यासाठी प्रत्येक किंवा इतर असभ्य शिष्टाचार यांचा वापर करण्याचा प्रयत्न करू नये. तसेच त्यांनी कोणत्याही गोष्टीचा किंवा इतर लोकांच्या चुकांचा योग्य फायदा घेऊ नये.

**५. सेवेचे तत्व**

समाजामध्ये जास्तीत जास्त सेवा पुरवठा करून मिळालेल्या पैशाचा वापर समाजाच्या कल्याणासाठी करणे. हे व्यवसायिक नीतिमूल्यं साठी आवश्यक तत्व आहे.

**६. माहिती देण्याचे तत्त्वे**

सध्या विविध गुंतागुंतीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळेच माहिती देणे व व्यवहारांची पारदर्शकता ठेवणे या गोष्टींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे व्यवसायामध्ये या तत्त्वाचे पालन करणे आवश्यक आहे.

**व्यवसायिक नैतिकतेचे महत्व**

**१. आकलनास मदत**

समाजव्यवस्थेत व्यवसायाची सत्ता आणि प्रभाव वाढत आहे. व्यवसायांचा प्रभाव का व कसा वाढत आहे याचे आकलन आपणास व्यवसायिक नीतिमूल्यं मुळे होते. तसेच यांचे परिणाम आणि या परिस्थितीचे स्वरुप जाणून घेण्यासाठी देखील व्यवसायिक नीतिमूल्यांची मदत होते.

**२. सदिच्छा मध्येवाढ**

समाजव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देण्याची क्षमता व्यवसायांकडे असते. व्यवसाय वस्तू व सेवा उत्पादित करत असतानाच त्यातून रोजगाराची निर्मिती होते. तरुणांमध्ये भर पडते आणि आर्थिक वृद्धी जालना प्राप्त होते. त्यामुळे व्यवसाय नैतिक आचरण हा द्वारे आपल्या सदिच्छा वाढ घडवून आणू शकतात.

**३. विश्वास व आत्मविश्वास यांची निर्मिती**

व्यवसायिकांनी अधिकारांचा केलेला दुरुपयोग व्यक्ती व समुदाय आणि सभोवतालचे वातावरण यांवर प्रभाव पाडणारा ठरतो. अधिकाऱ्यांच्या दुरूपयोगाची कारणे आणि परिणाम यांची माहिती व्यवसायिक नीतिमूल्यंतून प्राप्त होते. यातून व्यवसायाच्या नातेसंबंधात विश्वास व आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होते.

**४. आव्हानांच्या आकलनास मदत**

मागणीत वाढ झाल्यामुळे व्यवसाय अधिक गुंतागुंतीचा व आव्हानात्मक बनतो. या आव्हानांचे अधिक स्पष्टपणे आकलन होणारी साधने व्यवसायिक नीतिमूल्ये पुरवितात.

**५. नैतिक निर्णय प्रक्रियेत सुधारणा**

निर्णय प्रक्रिया अधिक नैतिक स्वरूपाची बनावी. यासाठी व्यवसायिक नीतिमूल्य व्यवस्थापकांना उपयुक्त ज्ञान आणि तंत्र पुरवितात यातून नैतिक समस्यांचे आकलन करून घेणे व त्यांची सोडवणूक करणे व्यवस्थापकांना शक्य होते.

**६. व्यवसाय सातत्य स्मदत**

व्यावसायिक नीतिमूल्य मुळे व्यवसायाचे सातत्य टिकवून राहण्यास मदत होते. कारण व्यवसायांनी जर व्यवसायिक नीतिमूल्यांचा अवलंब केला तर व्यवसाय दीर्घकाळापर्यंत निरंतर स्वरूपात टिकून राहू शकतात.

**७. नफ्याचे मोजमाप करण्याची क्षमता**

नफा आणि व्यवसायिक नैतिक समस्या यांचे मोजमाप करण्याची क्षमता व्यवसायिक नीतिमूल्य पुरवितात. त्यामुळे व्यवसाय विविध मागणी द्वारे नफा प्राप्त करण्यासाठी नैतिक प्रयत्न करतात.

**<u>मानवी मूल्य आणि नैतिकता</u>**

**अर्थ**

मूल्य ही आपल्या जीवनाची मार्गदर्शक तत्वे आहेत. दैनंदिन जीवनात सकारात्मक मानवी वर्तन आणि कृतीसाठी आवश्यक आहेत. माणसाच्या आवडी-निवडी गरजा इच्छा आणि प्रधान यांच्या आधारित तयार केल्या जातात.

**<u>मानवी मूल्यांचे महत्व</u>**

1. दैनंदिन जीवन जगण्यासाठी मार्गदर्शक म्हणून.
2. जीवनाला दिशादेण्यासाठी.
3. जीवनातील समाधान मिळविण्यासाठी.
4. चारित्र्य विकसित करण्यासाठी.
5. आपली संस्कृती आणि वारसा जतन करण्यासाठी.
6. विचारांमध्ये सकारात्मकता आणण्यासाठी.
7. समाजामध्ये शांतता व सहकार्य निर्माण करण्यासाठी मानवी मूल्य आवश्यक आहेत.

**<u>मानवी मूल्यांची निर्मिती</u>**

**1. अनौपचारिक पद्धत**

यामध्ये मानवी स्वभावातच असणारी शिस्तप्रियता आणि सामाजिक तत्त्वांची जपणूक करण्याची प्रवृत्ती या गोष्टी उपजतच असतात. या गुणांचा उपयोग औपचारिक गुणांचे जतन करण्यासाठी होतो असे सांगितले आहे.

**2. औपचारिक पद्धत**

यामध्ये मूल्यं बद्दलची स्पष्टता भावनिक विकास प्रसार संकल्पनात्मक विकास आणि व्यक्तिमत्व विकास इत्यादी गुणांवर आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम होऊन हे गुण विकसित होत असतात. यामुळे या गुणांना नियमांचे बंधन असते.

वरील दोन्ही गुणांची सांगड घालून मानवाला मानवी मूल्यांची मदत घेऊन आदर्श वर्तणूक करण्यास मदत होऊ शकते.

**व्यावहारिक नीतिमूल्य-**

**अर्थ**

व्यावसायिक लोक हे आपल्या ज्ञानाचा वापर करून सर्वसामान्य लोकांसाठी सेवांची निर्मिती करतात. यावेळी व्यवसायिक नीतिमूल्यांचा प्रश्न उपस्थित होतो. यात व्यवहारात निर्माण होणाऱ्या नैतिक समस्यांचे निवारण कसे करायचे याबाबत व्यवसायिकांनी स्वीकारलेल्या मापदंड याचा समावेश होतो.

**व्यवहारिक नीतिमूल्यांची महत्व**

**1. उद्देशांची वृद्धी**

व्यवसाय आणि व्यवसायाचे कर्मचारी यांच्या कृती आणि वर्तन हे व्यावसायिक दृष्ट्या व नैतिक दृष्ट्या जबाबदार मानले जाते. त्यामुळे व्यवसायाच्या उद्दिष्टांची वृद्धि करताना कर्मचारी व ग्राहक व स्पर्धक यांच्या हितसंबंधांना बाधा पोहोचणार नाही, अशी कृती नैतिकदृष्ट्या अपेक्षित असते.

**2. आदर्शाचेमापदंड**

व्यवसायातील वरिष्ठ पातळीवरील अधिकारी आणि प्रमुख यांनी अशाप्रकारे आचरण करणे अभिप्रेत असते की, जेणेकरून इतरांना आदर्श प्राप्त होईल, म्हणजेच त्यांनी आपल्या आचरणातून आदेशाचे मापदंड प्रस्थापित क**रावे.**

**3. नीतिमूल्यांची संहिता**

व्यवसाय नीतिमूल्य ही मानकांचा एक संच असतात की, ज्याचा व्यावसायिक संघ याद्वारे स्वीकार केला जातो. व्यवसायिक नीतिमूल्ये ज्या मानकाद्वारे कार्यान्वित होतात ती मानके म्हणजे नीतिमूल्यांची एक सहिता महत्त्वाची असते.

**4. नैतिकतेची संकल्पना**

व्यवसायिक नीतिमूल्यांची नैतिकतेची संकल्पना महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे व्यवसायाने वृद्धीसाठी रास्त साधने वापरावीत सर्व ग्राहकांना योग्य व समान वागणूक द्यावी. तसेच विक्री करताना प्रामाणिक स्वरूपाच्या कार्यक्रमाचा अवलंब करणे.

**व्यवस्थापन आणि नीतिमूल्य**

ग्राहक आणि व्यापारी आणि व्यवसायिक वर्गावर सतत विश्वास ठेवावा, यासाठी व्यवसायिक नीतिमूल्यांची पालन करणे अत्यंत गरजेचे आहे की आवश्यकता खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**1. ग्राहकांचा विश्वास संपादन करणे व वाढवणे**

पैसे देऊन विकत घेतलेल्या वस्तूंच्या किमती उपयुक्तता दर्जा आणि विश्वसनीयता याबाबत ग्राहकाला सतत विश्वास वाटणे महत्वाचे आहे. व्यापारी नीतिमूल्यांची पालन हा असा विश्वास संपादन करण्याचा आणि वाढविण्याचा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे.

**2. व्यापारातील गैरवापर टाळणे**

मानवी स्वभाव वैशिष्ट्यांमुळे अनेकदा गैरप्रकार करून नफा वाढविण्याचा प्रयत्न व्यावसायिकांकडून होऊ शकतो. नीतिमूल्यांची पालन केल्याने आपोआपच अशा गैरप्रकारांना वचक असतो.

**3. ग्राहकांचे संरक्षण करणे**

घटनेनुसार सर्व ग्राहकांना काही मूलभूत हक्क प्राप्त झाले आहेत. व्यवसायिक निती मूल्यांचे पालन केल्याने हे हक्क अबाधित राहू शकतात आणि त्याद्वारे एक प्रकारे समाज कल्याण ही साधले जाते.

**4. व्यवसायाची प्रतिमा उजळ राखणे**

कष्टानं उभ्या केलेल्या व्यवसायाचे नाव व प्रतिष्ठा चिरकाल रहावी, यासाठी व्यवसायिक नीतिमूल्य महत्त्वाची आहेत. भारतातील टाटा समूहाचे नाव आणि प्रतिष्ठा गेली 150 वर्षे कायम टिकून आहे यामागे त्यांनी नीतिमूल्यांची काटेकोरपणे पालन केले हे महत्त्वाचे कारण आहे.

**5. सर्व संबंधितांचे हीतसांभाळणे**

व्यवसाय मध्ये कर्मचारी भागधारक स्पर्धक व्यापारी पुरवठादार अशा अनेकांशी संबंध येत असतात. व्यवसायिक नितीमुल्य सांभाळून सर्व संबंधितांचे हिट जोपासणे ही व्यवसायाची एक जबाबदारी समजली पाहिजे.

6. **सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे**

ग्राहकांना वाजवी किमतीमध्ये चांगल्या दर्जाचा मालक किंवा सेवा पुरेशा प्रमाणात आणि वेळेवर उपलब्ध करून आपण समाजाची एक प्रकारे सेवाच करत असतो, हे व्यवसायिक आणि लक्षात ठेवणे गरजेचे असते.

7. **समाजाची व इतर व्यवसाय शी चांगले संबंध ठेवणे**

व्यवसायाला सतत समाजाकडून समर्थन मिळाले तरच तो विकास करू शकतो. व्यावसायिक नीतिमत्ता जोपासली तर इतर व्यावसायिकांशी आणि संबंधितांशी चांगले नाते प्रस्थापित होण्यास मदत होते.

**<u>नीतिमूल्य विषयक महात्मा गांधीजींचा दृष्टीकोन</u>**

महात्मा गांधीजींच्या मते शरीर जगवण्यासाठी व चांगल्या स्थितीत राखण्यासाठी जेवढ्या वस्तूंची गरज आहे. तेवढ्याच वस्तू व्यक्तीने जवळ बाळगला पाहिजे नैतिकता हा महात्मा गांधींच्या विचारांचा कणाहोता. जे अर्थशास्त्र नैतिक केवळ दुर्लक्ष करते ते चांगले अर्थशास्त्र करू शकत नाही, असे गांधीजी मानत. गरजा मर्यादित असतात हा अर्थशास्त्रातील सिद्धांत गांधीजी अमान्य करतात. त्यांच्या मते गरजा या माणसाने ठरवायच्या असतात व्यवसायमध्ये नितीमुल्ये जोपासली पाहिजे, हे एक महत्त्वाचे नीतिमूल्य महात्मा गांधीजींनी समाजाला सांगितल्या.

**गांधीजींचा विश्वस्त मूलाधार**

1. रक्त शरीरात रक्त सदोदित प्रवाहित रहाणे चांगले असते. तसेच रक्तसंचार घातक ठरतो. त्याप्रमाणे श्रीमंत वर्गाकडे धनसंचय घातक ठरतो त्याप्रमाणे श्रीमंत वर्गा कडील धनसंचय राष्ट्रालाही हानीकारक ठरतो. त्या धनाचा प्रवाह समाजासाठी प्रवाहित झाला पाहिजे असे गांधीजींना वाटते
2. संपत्ती हे सहाय्य नसून सुखी किंवा दुःखी करण्याचे ते साधन मात्र आहे यापलीकडे काहीच असू शकत नाही याची जाणीव प्राधान्याने माणसाला संपत्ती मान वर्गाला झाली पाहिजे आपल्याकडील अतिरिक्त संपत्तीचे आपण केवळ विश्वस्त आहोत असे सर्वांनी मानले पाहिजे.

3. विश्वस्तांनी या आपला वारसदार नेमू नये, असाही गांधीजींचा कटाक्ष होता तो वारसदार राजाने ठरवावा.
4. समाजातील बुद्धिमान व संपत्ती मान वर्गाने राष्ट्राच्या संपत्तीत वाढ करण्यासाठी आपली बुद्धी पणाला लावली पाहिजे.
5. महात्मा गांधी विश्व संकल्पनेचा संपूर्ण जगाने स्वीकार करावा, तेवढी मौलिक संकल्पना त्यांनी समाजासमोर मांडली.

**<u>नीतिमूल्य बाबत जागतिक प्रवृत्ती किंवा जागतिक बदल</u>**

कॉर्पोरेट जबाबदारी आणि नीतिशास्त्र कार्यसंघ व धोरण आणि संस्कृती या विषयांना संघटनात्मक बदल आवश्यक आहेत. तसेच आंतरिक कार्य संघांमध्ये विचार करण्याचा दृष्टिकोन आवश्यक आहे हे ओळखून कार्य चालू आहे.

**उदयोन्मुखजागतिक ट्रेडर्सचे सौदे पुढीलप्रमाणे**

1. **अति पारदर्शकता आणि त्याचे परिणाम**
2. **वैयक्तिक आणि एकत्रित सशक्तीकरण आणि वाढत्या अपेक्षा**
3. **डेमोग्राफिक शिफ्ट आणि ऑटोमेशन ऑफ वर्क**

---

**संदर्भ ग्रंथ**


१. ग्राहक संरक्षण आणि व्यावसायिक नितीमुल्ये- प्राचार्य – डॉ. प्रसन्न कुमार देशमुख आणि सहकारी प्रध्यापक

२. ग्राहक संरक्षण आणि व्यावसायिक नितीमुल्ये- डॉ. डी.डी.पवार आणि सहकारी प्रध्यापक

३. ग्राहक संरक्षण आणि व्यावसायिक नितीमुल्ये- प्रा.अरुण गायकवाड आणि सहकारी प्रध्यापक